**नियमित दिवाणी दावा क्र. ०८/२००८ मधील**
**नि.क्र. ११८ वरील आदेश**
**सौ. कृपा मारुती हळ्ळीकर वि. श्री. बेंजामिन तातोबा धुपदाळे, वगैरे.**

प्रस्तुतचा दावा हा वाटपाचा, कब्जेचा व निरंतर मनाई हुकूमाचा आहे. दिवाणी प्रक्रिया संहिता, १९०८ चे क्रम ६, नियम १७ अन्वये, नि.क्र. ११८ वर दाखल केलेल्या या अर्जाद्वारे वादी हे वादपत्रामध्ये दुरुस्ती करण्यास परवानगी मागत आहे. अर्जात नमुद कथन संक्षिप्तपणे पुढीलप्रमाणे विषद करता येईल. वादी कथन करतात की, वादपत्रातील परिच्छेद क्र. ३ मधील ओळ क्र. ८ व १२ मध्ये मिळकतीचा क्रमांक ८२५ असा चुकीचा नमुद झाला असून त्याठिकाणी गट क्र. १९ (सि.स.नं. २५२) असा नमुद असणे आवश्यक आहे. तशा प्रकारची दुरुस्ती वादपत्रात करण्यास वादी हे परवानगी मागत आहेत. वादी कथन करतात की, दावा दाखल करतेवेळी वादीकडे आवश्यक तो अभिलेख उपलब्ध नसल्याने वादपत्रात सदर चूक झाली आहे. सदर दुरुस्तीमुळे दाव्याच्या स्वरुपात कोणताही बदल होणार नाही, मात्र अशी दुरुस्ती करण्यास वादीस परवानगी दिली नाही तर, वादींचे अतोनात व कधीही न भरुन येणारे नुकसान होणार आहे. याउलट, प्रतिवादींची कोणतीच हानी होणार नाही. यास्तव, वादीने उपरोक्तप्रमाणे दुरुस्ती मागितली आहे. अर्जासोबत वादीचे शपथपत्र जोडले आहे.

२. अर्जाच्या मलपुष्ठावर प्रतिवादी क्र. १ यांचा खुलासा सादर करण्यात आला आहे. तथापि, उर्वरित प्रतिवादी यांनी अर्जास विहित अवधीत त्यांचा खुलासा सादर न केल्याने या अर्जाची चौकशी त्यांच्या खुलाशाशिवाय घेण्यात आली. प्रतिवादी क्र. १ कथन करतात की, प्रस्तावित दुरुस्तीचे स्वरुप पाहता, त्यामुळे दाव्याचे स्वरुप बदलणार आहे. यापूर्वीही वादीने ब-याचवेळा वादपत्रात दुरुस्त्या केल्या आहेत. वादीने केवळ वेळ काढूपणासाठी प्रस्तुतचा अर्ज दाखल केला असून तो खर्चासह फेटाळण्याची प्रतिवादी क्र. १ यांनी विनंती केली आहे.

३. वादीतर्फे त्यांचे विधिज्ञ श्री. आर.पी. बांदिवडेकर यांचा व प्रतिवादी क्र. १ तर्फे त्यांचे विधिज्ञ श्री. व्ही.बी. कडुकर यांचा युक्तिवाद ऐकला.

४. प्रस्तावित दुरुस्तीमुळे वादी हे वाद मिळकतींमध्ये दुरुस्ती मागत नाहीत तर एका व्यवहारातील खुल्या जागेचे ठिकाण दर्शविल्या ठिकाणी दुरुस्ती मागत आहेत. प्रस्तावित दुरुस्ती ही वस्तुस्थितीशी विपरीत असल्याचे प्रतिवादी क्र. १ यांचे कथन नाही. त्यामुळे, प्रस्तावित दुरुस्तीमुळे संपूर्ण दाव्याचे स्वरुप बदलतो हे प्रतिवादी क्र. १ यांचे कथन स्विकारार्ह ठरत नाही.

५. दिवाणी प्रक्रिया संहिता, १९०८ चे क्रम ६, नियम १७ पुढीलप्रमाणे उध्दृत करते. :-

> *''१७. न्यायालयास कार्यवाहीच्या कोणत्याही टप्प्यावर दोहोंपैकी कोणत्याही पक्षकारास, त्याच्या वादकथनास न्याय्य असेल अशा रितीने व अशा अट्टींवर बदल करण्याची किंवा दुरुस्ती करण्याची मुभा देता येईल आणि पक्षकारांमध्ये वादग्रस्त असलेला खराखुरा प्रश्न अभिनिर्णित करण्यासाठी आवश्यक असतील त्याप्रमाणे अशा सर्व दुरुस्त्या केल्या पाहिजेत.*
>
> *परंतु, वाजवी दक्षता बाळगुन सुध्दा, वादाची चौकशी आरंभ होण्यापूर्वी, तो पक्ष, अशी दुरुस्ती मागणी करु शकली नाही असे न्यायालय निष्कर्षाप्रत आल्याशिवाय, दाव्याच्या सुनावणीची सुरुवात झाल्यानंतर, असा दुरुस्तीचा अर्ज मान्य करता येणार नाही.''*

६. उपरोक्त तरतुदीचे काळजीपूर्वक अवलोकन करता, दाव्याच्या प्रभावी सुनावणीस सुरुवात झाल्यानंतर, संबंधित पक्षकार वाजवी दक्षता बाळगुन सुध्दा, अशा प्रकारची दुरुस्ती करण्यास सक्षम नव्हता याबाबत न्यायालय निष्कर्षाप्रत आल्याशिवाय वाद प्रकरणाच्या प्रभावी सुनावणी सुरु झाल्यानंतर असा दुरुस्तीचा अर्ज मान्य करता येणार नाही हे स्पष्ट होते. प्रस्तुत प्रकरणात न्यायालयाने नि.क्र. ५० वर दि. २८/११/२०१२ रोजी वादमुद्दे काढल्यानंतर सदर प्रकरण हे आता चौकशीस प्रलंबित आहे. त्यामुळे, उपरोक्त तरतुदीनुसार हे स्पष्ट आहे की, न्यायालयास प्रकरणाच्या कोणत्याही टप्प्यावर वाद कथनांमध्ये दुरुस्ती करण्यास परवानगी देण्याचा अधिकार आहे. मात्र अशी दुरुस्ती वादातील पक्षकारांमध्ये असणा-या वादप्रश्नांचे निराकरण करण्यास अथवा निश्चित करण्यास आवश्यक असले पाहिजे. तथापि, सदर तरतुदीखाली असणा-या परंतुकानुसार, अशी दुरुस्ती मागणी करणा-या पक्षकाराने वाजवी दक्षता बाळगून सुध्दा संबंधित

पक्षकार वादाची चौकशी सुरु होण्यापूर्वी अशी दुरुस्ती मागण्यास असमर्थ होता असे न्यायालयाचे निष्कर्ष झाल्याशिवाय अशी दुरुस्ती दाव्याची चौकशी सुरु झाल्यानंतर मान्य करु नये. वादींनी मागणी केलेल्या प्रस्तावित दुरुस्तीचे अर्जातील कथनांच्या पार्श्वभुमीवर विचार करता, वादपत्रात झालेली चूक ही दावा दाखल करतेवेळी वादीकडे अभिलेख उपलब्ध नसल्यामुळे झाली आहे. अनावधान हा मानवी स्वभावाचा पैलू असल्याने वादीचे कथन संपूर्णतः नाकारले जावू शकत नाही. 'अनावधान' व 'दक्षता' हया दोन्ही बाबी भिन्न आहेत. एखादी व्यक्ती एखादया घटनेबाबत अनावधान असेल याचा अर्थ ती व्यक्ती दक्ष नाही असा होत नाही. स्मरण व विस्मरण हया दोन्ही बाबी मानवी स्वभावाच्या सर्वगामी मुलभूत पैलू आहेत. त्यामुळे, त्यातून वादींच्या वाजवी दक्षतेबाबत प्रश्नचिन्ह निर्माण करणे न्यायोचित होणार नाही. त्यामुळे, वादी हे दक्ष नव्हते असा अन्वयार्थ त्यातून काढणे योग्य होणार नाही. प्रस्तुत दाव्याची चौकशी सुरु झाली आहे हे निर्विवाद. तथापि, प्रस्तावित दुरुस्तीमुळे दाव्याचे स्वरुप मुळीच बदलणार नाही व ही दुरुस्ती मान्य केल्यास प्रतिवादींची फारशी हानी सुध्दा संभवत नाही. याउलट, या दुरुस्तीशिवाय दाव्याचे काम पुढे चालल्यास, पुढे जावून वादामध्ये व हुकूमनाम्याच्या बजावणीमध्ये क्लिष्टता निर्माण होवू शकते. या सर्व कारणांस्तव, वादीचा प्रस्तुत अर्ज मान्य होण्यास पात्र ठरतो. वादीस यापूर्वीच प्रस्तुत अर्ज दाखल करुन वादपत्रामध्ये दुरुस्ती मागता आली असती मात्र वादीने तसे केले नाही. त्यामुळे, प्रस्तुत अर्ज दाखल करण्यास विलंब झाला आहे ही बाब निरपवाद आहे. तथापि, विलंबाने दाखल केलेल्या या अर्जामुळे व त्यायोगे होणा–या व झालेल्या दाव्याच्या चौकशीमधील विलंबामुळे प्रतिवादींची कालापव्ययामुळे जी हानी झाली आहे ती भरपाई करण्याजोगी आहे व यासाठी प्रतिवादींना रोख रकमेचा खर्च अदा करणे शक्य आहे. परिणामी, निम्न आदेश.

**<u>आ दे श</u>**

नि.क्र. ११८ वरील वादपत्र दुरुस्तीचा अर्ज पुढीलप्रमाणे मान्य करण्यात येत आहे.

वादीने प्रतिवादी क्र. १ यास खर्चापोटी रक्कम रु. ५००/– अदा केल्यानंतर वादीने अर्जात मागणी केल्यानुसार वादपत्रामध्ये दुरुस्ती करण्यास परवानगी देण्यात येत आहे.

खर्च रकमेची पूर्तता ही या आदेशाची पूर्वअट राहील.

वादीने या आदेश्याचा दिनांकापासून १४ दिवसाच्या आत उपरोक्तप्रमाणे वादपत्रात दुरुस्ती करावी व दुरुस्त दाव्याची प्रत व त्याच्या पुरेश्या प्रतींसह व हुकूमनाम्यासाठीच्या प्रतीसह अभिलेखावर दाखल करावे.

Amrit Chandrakant Birajdar

Digitally signed by Amrit Chandrakant Birajdar
Date: 2019.10.16 15:22:07 +0530

दि.१५/१०/२०१९ (**अमृत चं. बिराजदार**)
चंदगड दिवाणी न्यायाधिश क. स्तर, चंदगड

**C E R T I F I C A T E**

I affirm that the contents of this P. D. F. file Judgment/Order are same, word to word, as per the original Judgment/Order.

| | |
|---|---|
| Name of the Stenographer | Shri. V.G. Kamble, L. G. Stenographer. |
| Name of Court | Shri. A. C. Birajdar,<br>Civil Judge, Junior Division and Judicial Magistrate, First Class, Chandgad. |
| Date of Dictation | 15/10/2019 |
| order signed by the P. O. on | 15/10/2019 |
| order uploaded on | 16/10/2019 |